# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 20/01/2022 (गुरूवार)
(सकाळ)

---

### खून

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 14 कि. मी अंतरावर मौजा महादुला शिवारातील रामटेक तुमसर रोड लगत नाली मध्ये दिनांक 18/01/2022 चे 18.00 वा. दरम्यान अज्ञात आरोपीने अज्ञात कारणावरून अनोळखी इसमाचे वय अंदाजे 55 ते 60 वर्ष (पुरूष जातीचे) प्रेत धारदार शस्त्राने गळा कापुन खुन करून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने महादुला शिवारातील रामटेक तुमसर रोड लगत असलेल्या नालीत आणुन टाकले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– शिवचंद महादेव मोहने, वय 49 वर्ष, रा. महादुला ता. रामटेक जि. नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 302, 201 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोनि श्री. प्रमोद मकेश्वर मो.क्र. 9049965014 हे करीत आहे.

### चोरी

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 09 कि.मी. अंतरावरील आजनगाव शेत शिवार येथे दिनांक 17/01/2022 चे 18.00 वा. 18/01/2022 चे 19.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– पुनाराम रूशी मेश्राम वय 57 वर्ष रा. आजन गाव ता. मौदा यांचे शेतातील बोरवेल ला लागून असलेले पाईप तुटलेले दिसले. फिर्यादीने शेतात पाहणी केली पाणी वोलण्याची बोरवेल 3 एचपी चीप पाणबूडी, 250 फूट वायर कि. 20,000/–रु. चा माल कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरून नेले. तपासादरम्यान आरोपी क्र. 1) अजबकुमार अत्तरसिंग कंगाली, वय 37 वर्ष, रा. धामणगाव, 2) मुकेश चंद्रकांत कुंभरे, वय 30 वर्ष, रा. धामणगाव, 3) तराचंद लाला काळे, वय 30 वर्ष, रा. धामणगाव व 4) डीमदेव वसंता पंचबुद्धे, वय 40 वर्ष, रा. धामणगाव हे निष्पन्न झाल्याने यांना अटक करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार येंगलवार मो.क्र. 9423219429 हे करीत आहे.

### मोटरसायकल चोरी

पो.स्टे. रमटेक :– अंतर्गत 01 कि.मी. अंतरावरील महात्मा फुले वार्ड रामटेक येथे दिनांक 19/01/2022 चे 00.30 वा. ते 05.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– अनिश जुम्मन सैय्यद, वय 30 वर्ष, रा. महात्मा फुले वार्ड, लाल दिवान शहा दर्गा जवळ रामटेक याने त्याच्या घरासमोर लॉक करून ठेवलेली त्याची एमएच– 40/एक्स– 7210 क्रमांकाची हीरोहोन्डा पॅशन प्रो मोटारसायकल किमती 15,000/–रु. व फिर्यादीचा भाचा तौसिफ जहीद अली सय्यद अली याची एमएच– 31/डीवाय– 7768 क्रमांकाची मोटरसायकल किमती 15,000/–रु. असा एकुण कि. 30,000/–रु. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार सदाशिव काठे मो.न. 9011326793 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर